श्वास रोखायला लावणारी एक विलक्षण कादंबरी

# कुठंतरी पाणी मुरतंय..!



ॲड. अरुण देशमुख

Scanned by CamScanner

# अर्पण पत्रिका

माझ्या क्रीडा व कायदा या विषयांवरच्या १८ पुस्तकानंतर हे लिहिलेल्या पहिल्या कादंबरीचे पुष्प मी माझ्या लाडक्या भुसावळच्या पणजीच्या चरणी अर्पण करीत आहे. मला ' झुल्या ' असे लाडाने हाक मारणाऱ्या पणजीने माझे लहानपणाचे दिवस खऱ्या अर्थाने जगवले. पहाटे ४ वाजता तापी नदीवर स्नान करण्यास जाणाऱ्या पणजीने शेवटपर्यंत तब्येत राखली. अजानशत्रू असणारे तिचे व्यक्तिमत्व मला भारावून टाकायचे. मी भुसावळला आलो की दहीकाला करणार व कौतुकाने सर्व देवळं व मैत्रिणींकडे ती न्यायची. खरेच ! पणजी कुठे आहे तू ? आजही तुझी आठवण येते गं !!



Scanned by CamScanner

## प्रकरण – १

आसमंतात लख्ख प्रकाश पडला अन् पाठोपाठ वीज कडाडण्याचा जोरदार आवाज झाला ! तेजा विजेच्या डरकाळीनं मनातून टरकलीच. ऑगस्टचा जरी महिना असला तरी आज पावसाचं कोणतंही चिन्ह मालाडवरुन निघताना नव्हतं. त्यामुळे झक मारली आणि साडी घातली असं तिला वाटलं.

जोरदार पाऊस पडत असतानाही केवळ बहिणीसाठी तेजा निश्चयाने बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्सला जाण्यासाठी निघाली होती. घरातून रिक्शाने स्टेशनपर्यंत ती आली. त्यानंतर बांद्रापर्यंतचे परतीचे तिकीट काढण्यासाठी तेजा रांगेत उभी राहिली. तिकीट देणारा तिकिटे एवढ्या मंद गतीने देत होता की तेजाला खरं तर त्याचा किंबहुना स्वत:चाच राग आलेला होता. खास करुन ती ज्या रांगेत उभी होती त्याच्या बाजूची रांग पटपट संपत होती. तर तिच्या रांगेत कोणीतरी पैशावरुन हुज्जत घालत होता. ' या जगात जगताना योग्य वेळ तुमचे आयुष्य बदलून टाकेल हा खरे तर एक फसवा समज आहे. तुम्हाला मिळणाऱ्या

संधीची संपणारी तारीख फक्त ती वेळ बदलवत असते. '

तेजस्विनी स्वत:लाच असं काहीसं सांगत शांत करत ही कठीण परिस्थितीही स्वत:ला दूर राहाण्यासाठी रागावर आवर घालत होती.

' ओ भाईसाहब झगडा बाद में करो, हमको टिकीट निकालने दो, प्लीज...! '

आपल्या स्वभावाच्या खरं तर विरोधाभास असणारा हा अजीजीचा स्वर तेजस्विनीने लावला अन् तो हुज्जत घालणारा नरमला व हळूच बाजूला होत सटकला ! शेवटी एकदाची तिकीट तिला मिळाली व तेजा झटझट प्लॅटफॉर्म चढून क्रमांक २ च्या प्लॅटफॉर्मवर आली. स्लो गाडीच तिच्या सेवेसाठी उपलब्ध होती. लेडीजच्या डब्यामध्ये चढून तेजा मालाडवरुन बांद्र्याला आली.

सकाळी निघताना थोडं ढगाळ वातावरण होतं. मात्र पावसाची कुठेही चिन्हं नव्हती. गाडी जेव्हा अंधेरीपर्यंत आली त्याचवेळेपासून पावसाची सर सुरु झाली. तेजा बांद्रापर्यंत आली तेव्हा एव्हाना पावसाला जोर चढला होता. तेजा त्याही परिस्थितीत पुढेच जात होती.

बांद्राच्या रेल्वेपुलावरुन तेजा खाली उतरली तेव्हा तिने हातात घेतलेली छत्री त्या पावसाच्या सरीसाठी छोटी व तोकडी भासत होती. तेजा उतरल्या उतरल्या रिक्शा कुठं मिळू शकते का याचा अंदाज घेऊ लागली. मात्र तिच्या अपेक्षेप्रमाणे तिला रिक्शा भेटलीच नाही, मग तशीच पुढे ३१०च्या बस स्टॉपवर ती आली. सकाळीच तेजस्विनीच्या मनात शंकेची पाल चुकचुकली होती !

' आज पाऊस पडला तर ?'

तेजस्विनीला आज खरंच पटलं की, ' अडचणींचा विचार करत बसलं तर आणखीन अडचणीच वाढतात व जीवनात त्या अडचणींवर मात करण्यासाठी शक्यतो विचार केला तर नविन संधी हात जोडून उभ्या राहातात !'

पूर्णपणे भिजलेली तेजा खरंतर जरा बावरलेलीच होती. तेजा तशी गौरवर्णीय होती. तिने आपले केस सोनेरी केले होते व खांद्याच्या दोन्ही बाजूने ते पुढे मोकळे सोडले होते. अंगात गुलाबी रंगाची सिफॉन साडी नेसली होती. त्यावर मॅचिंग रंगाचा ब्लाऊज होता, कानात मॅचिंग टॉप्स तर नखाला गुलाबी नेलपेंट तिने लावले होते. तेजाने डोळ्यात



Scanned by CamScanner

काजळ तर ओठाला हलकीशी लिपस्टीक लावलेली होती. डाव्या मनगटावर टायटनचे घड्याळ तर उजव्या हातात गुलाबी खड्यांचे ब्रेसलेट घातले होते. पायात हिलच्या सँडलच्यावर पैंजण घातल्याने मधुर ध्वनी येत होता. एका हाताने छोटी रंगीत छत्री पकडत दुसऱ्या हाताने पांढऱ्या रंगाची पर्स खांद्याला अडकवून तिने बराच वेळ ३१० क्रमाकांच्या बसची वाट पाहिली. मात्र नेहमी ५ मिनिटांनी येणारी ही बस आज काही केल्या येईना. त्यामुळे स्वत:ला व बसला दोघांनाही शिव्या घालत तेजाने आपला मोर्चा पुन्हा एकदा रिक्शाकडे वळवला.

तेजाला तेवढ्यात एक रिक्शा दिसली.

'रिक्शा–रिक्शा'

असे ओरडून तेजाने रिक्शाला थांबवले. बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स हे शब्द ऐकताच एक दोन रिक्शावाल्यांनी तिच्याकडे चक्क दुर्लक्ष केले... त्यानंतर एक खटारा रिक्शा जी विशिष्ठ आवाज करत कुरकुरत होती ती तेजापाशी थांबली.

हा रिक्शावाला मात्र तेजाकडे पाहून थांबला. काहीही न बोलता त्याने मान थोडी वर करत मानेनेच तेजाला विचारले,

'कहाँ ?'

तेजाने तोंडाने कसेबसे हसत त्याला सांगितलं.

'डायमंड मार्केट, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स.'

डायमंड मार्केट, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स हे शब्द ऐकताच या रिक्शावाल्यानेही बांद्राहून तिकडे जाण्यासाठी आडेवेढे घ्यायला सुरुवात केली.

'मॅडम, बारिश बहुत हो रही है और गॅस भी खतम होनेको आया है!'

तेजाने त्याला परत अजीजी करत सांगितले,

'अरे, चलो ना भाईसाहब मुझे जल्दी है!'

त्यावर तो रिक्शावाला सरळ सरळ खरं बोलला.

'मेरी रिक्शा उधर नहीं जायेंगी! रिटर्न का पॅसेंजर उधर से नहीं मिलता... !'

तेजाला घाई होती व ती भिजलेली होती. तिने त्याला सरळ विनंती करीत सांगितले,



Scanned by CamScanner

‘ भैय्याजी दया करो, चाहता तो मैं भाडा डबल देती हूँ पर मुझे वहाँ जल्दी लेके चलो... ! ’

डबल हे शब्द ऐकताच जशी काय जादूची कांडी फिरली व तो कुरकुरणारा खटारा रिक्शाचा चालक तिला न्यायला तयार झाला. त्याने तिला रिक्शात झटदिशी घेतले.

रिक्शात आत बसून दोन्ही बाजूने प्लॅस्टिक कव्हर टाकत रिक्शावाल्याने रिक्शा सुरु केली अन् तेजाने आपले डोळे मिटले. तिच्या डोळ्यासमोर तिची धाकटी बहीण कविता तरळली. आज कवितासाठीच तर तिने स्वत:ला छान दिसावं म्हणून विशेष प्रयत्न केले होते.

कविता म्हणजे एक वादळच होते ! तेजापेक्षा निराळी दिसणारी कविता म्हणजे अखंड बडबडी होती. रंग गव्हाळ व उंच दिसणारी कविता. हिच बोलणं म्हणजे विकपॉईंट होता. तिचे बोलणे एकदा काय सुरु झाले की समाप्त कधी व्हायचे याचा नेम नव्हता. कविताला विषयाचे बंधनही नव्हते ना वयाचे ! एक वर्षाच्या बाळापासून ८० वर्षाच्या म्हाताऱ्यापर्यंत कविताला बोलण्यासाठी कोणीही चालायचा ! समोरचा ऐकतोय की नाही हे न बघताच तिची वटवट चालत असे. तिचा उजवा हात व पंजा बोलता बोलता सातत्याने ऐकवायचा. हाताची मस्त साथ तिच्या बोलण्याला मिळायची. लांबसडक बोटे असणारी कविता बोलताना हाताचा भरपूर वापर करायची. तिच्या एका हातात कसले तरी कडं असायचं तर कधी तरी मूड असला तर दुसऱ्या हातात घड्याळ बांधायची. मात्र यांच कविताचे डोळे बोलताना चमकायचे, नव्हे ती डोळ्याने अधिक बोलायची. त्यामुळे समोरचा तिच्या बोलण्याला कंटाळून सुद्धा तिचे बोलणे व हावभाव बघत बसायचा. कविताने केसांचा बॉयकट केलेला होता. कविता नेहमी जीन्स् टॉप वा टिशर्टस् घालायची. पायात स्पोर्टस् शूज़. त्यामुळे तिच्या चालण्यात एक प्रकारचा रूबाबदारपरा व मोकळेपणा होता. लाघवी बोलणारी कविता ही कबड्डीची चांगली खेळाडूही होती. अर्थात हे बाळकडू तिला तेजाकडून मिळालेले होते. त्यामुळे लाघवी दिसणारी कविता अंगाने दणकट होती. यांच कविताचं आणि विलासच्या प्रकरणाने तेजाची झोप उडाली होती.

तेजाने ऐकलं होतं की, विलासला एक मोठा भाऊ होता व त्या दोघा भावांचे ब़ांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये स्वत:चे मोठे ऑफीस होते.



Scanned by CamScanner

तिने हे ही ऐकले होते की ते दोघे भाऊ आय. टी. क्षेत्रात नावाजलेल्या कंपनीचे मालक होते. अल्पावधीत वडिलांचा कपड्याचा व्यापार चालू ठेवत आय. टी. क्षेत्रात त्यांनी उडी घेतली व बघता बघता काही कोटींमध्ये त्यांचा व्यापार गेला. सुमारे ८०० आय. टी. कॉम्प्युटर इंजिनियर ठेवणाऱ्या या दोघा भावांनी आपल्या कंपनीची स्वत:ची इमारत बांधली ती सुद्धा बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्समध्येच. पहिल्या दोन मजल्यावर ऑफीस तर वरच्या सर्व मजल्यांवर प्रत्यक्ष कामे केली जाऊ लागली. ह्या परिचयामुळेच तेजाची झोप उडालेली होती. ही श्रीमंतांची पोर मुलींना जसं फूल हुंगून चुरघळून फेकून देतात तसेच मुलींना फेकतात असेच तिने ऐकलेलं होतं. त्यामुळे तिने जेव्हा आपल्या बहिणीचे प्रताप ऐकले व ते कोणाबरोबर हे ऐकले तेव्हाच तिने कपाळावर हात मारुन घेतला होता. कविताला विलासवर भरोसा होता पण तेजाला आपल्या नशिबावर नव्हता. त्यामुळे तिने कधी नव्हे तेवढा भडक मेकअप मिडलक्लासची वाटू नये म्हणून केलेला होता. अर्थात तो मेकअप पावसाच्या कृपेमुळे जवळपास गायबच झालेला होता.

रिक्शा बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये आली. तसं पाहिलं तर बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्सची निर्मिती ही टाऊन प्लॅनिंग करुन केलेली होती. आधी कलानगर, त्यानंतर फॅमिली कोर्ट, रिझर्व्ह बँक इमारत इथंपर्यंत फुड मॉल्स असल्याने गर्दी असायची व तीही सर्व प्रकारच्या माणसांची. मात्र त्यानंतर एकदा का गटार ओलांडून पलीकडे गेलं की तिथला सर्व बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्सचा परिसर हा पांढरपेशी लोकांचाच वाटायचा. पॉश काचांच्या मॉलला लाजवतील अशा इमारती येथे होत्या. तिथे जाणारे–येणारे टाय–बूट घालूनच दिसत असल्याने येथे नेहमी सारखा ' गरीब भारत देश ' नव्हता तर ' इंडिया शायनिंग नव्हे रोकींग ' दिसत होता. बहुतेक काम करणारे विशी–पंचविशीतील होते. पांढऱ्या डोक्याचा प्राणी सहजगत्या दिसत नव्हता. इथे चहाच्या टपऱ्या नव्हत्या. ना पान बिडीची दुकाने. प्रत्येक इमारतीमध्ये कंपन्यांचे तिथल्या कामगारांसाठी स्वत:चे कॅन्टीन असायचे. इथे असणारी कोणीही व्यक्ती अचकट विचकट जोक्स करत उभा आहे असे कुठेही दिसत नव्हते, ना कोणीही रस्त्यावर काहीही खाताना दिसत नव्हते. इमारती स्वच्छ व बहुतांशी काचेच्या होत्या. कुठेही पानाची पिचकारी मारलेली नव्हती. सर्व वातावरणात



Scanned by CamScanner